**MHKO110000011986**

नियमित दिवाणी दावा क्र.७७/१९८६
(CNR No.MHKO110000011986)

निशाणी क्र.१३३ खाली आदेश

०१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा करारावरुन मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी कैफियत देवुन वादी हे शेतकरी नाहीत, अशी खोटी तक्रार केली. त्यामुळे तसा मुद्दा काढुन तो तहसिलदार, हातकणंगले यांच्याकडे पाठवला. त्यांनी टेनन्सी केस क्र.२५/२००२ चे कामी वादी हे शेतकरी असल्याबाबतचा निर्णय दिला. तोच निर्णय उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांनी टेनन्सी अपिल क्र.१९२/२००४ मध्ये कायम केला. त्या निर्णयाविरुध्द देखील प्रतिवादी यांनी महाराष्ट्र महसुल न्यायाधीकरण यांच्याकडे रिव्हीजन क्र.१९५/२००४ दाखल केले व ते फेटाळण्यात आले. सदर दावा गट क्र.३२३ पैकी दावा मिळकतीशिवाय ०.१६.२४ आर जमिन वादींच्या मालकी वहिवाटीस आजही असल्याने प्रतिवादींनी बेकायदेशिरपणे वादींच्या वहिवाटीस हरकत केली, म्हणुन वादींनी त्यांचेविरुध्द रे.क.क्र.१८४/२००४ चा कायम मनाईचा दावा दाखल केला. त्याकामी प्रतिवादींनी सदर बाब मान्य केली व दि.३०/०६/२०११ रोजी आपसात तडजोड पुरसीस दिली. त्यावरुन तडजोड हुकुमनामा झाला. यावरुन देखील वादी हे शेतकरी आहेत, ही बाब निर्विवादपणे शाबीत झाली आहे. टेनन्सी केस क्र.२८/२००५ चे कामी प्रतिवादी व तर्फे साक्षीदारांचा जबाब झाला आहे व ते हजर केले आहेत. वरीलप्रमाणे दाव्यानंतर घडलेल्या सर्व घडामोडी अभिलेखावर येवुन पुरावा करणे जरुरीचे आहे व दरम्यान आपसांत तडजोडीपोटी अलिकडे पर्यंत प्रयत्न चालु होते. असे असताना प्रतिवादी यांनी कोर्टासमोर

निवेदन करुन आपसांत तडजोड करणार नाही व एम.आर.टी.च्या निर्णयाविरुध्द हायकोर्टमध्ये गेले आहेत व पुढे सुप्रिम कोर्टात जाणार व दावा मिळकत अनिश्चित काळासाठी उपभोगणार व वादी कोर्ट कामातुन खेळवत ठेवणार अशी भाषा वापरली. त्यामुळे प्रतिवादीची कृती पहाता, दरम्यानचे उत्पन्नाची मागणी करणे क्रमप्राप्त झाले, असे सांगुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दावा अर्जी कलम २(अ), २(ब), २(क), २(ड) प्रमाणे मजकुर घालण्याची आवश्यकता असल्याने सदर दावा दुरुस्ती मंजूर करावी, अशी विनंती केली.

०३. वादींच्या कथनानुसार, सदर दुरुस्तीमुळे दाव्यानंतर ज्या घडामोडी घडल्या, तसेच वादाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती ही दाव्याचे मुळ स्वरुप बदलत नाही. एकंदरीतच वादाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्यासाठी सदर दुरुस्ती अभिलेखावर येणे न्यायाचे व अत्यावश्यक आहे. दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी देखील सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार नाही, उलट न्यायादानास मदत होईल. याऊलट अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल, असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादींनी निशाणी क्र.३४ वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादी व प्रतिवादींमध्ये टेनन्सी कोर्टामध्ये केस चालु होती व त्यानंतर एम.आर.टी. च्या निर्णयाविरुध्द त्यांनी मा.ना.हायकोर्टाकडे अपिल दाखल केल्याचे कथन करुन सदर काम प्रलंबित असल्याचे कथन केले. दावा मिळकतीखेरीज ७/१२ उता-यावर असलेले ०.१६.२४ आर क्षेत्र वादी स्वतः करत नाहीत व ती जमिन भरत यशवंत बाबर हे कसतात. तसेच वादी व प्रतिवादीच्या दरम्यान दोन्ही दाव्यामध्ये तडजोड झाली होती, त्याप्रमाणे फक्त रे.क.क्र.१८४/२००४ लोकन्यायालयात ठेवला गेला व त्यात तडजोड झाली. प्रस्तुत दावा मिळकतीबाबतचा दावा तसाच राहिला. दाव्यातील ३४ गुंठे क्षेत्र वादीस देण्याचे ठरवुन त्याप्रमाणे ते वादीच्या ताब्यात एक वर्ष दिले होते, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत पाईप लाईन आणली आहे व त्याचे पाणी प्रतिवादीने वादीस दिलेले आहे. परंतू वादीने ठरल्याप्रमाणे दावा कोर्टातुन काढुन घेतला नसल्याने प्रतिवादीने एम.आर.टी. चे निकालाविरुध्द हायकोर्टात काम दाखल केले. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी दावा चालवण्यासाठी मुद्दामपणे विलंब केलेला नाही

व त्यामुळे वादींना दरम्यानचे उत्पन्न दावा दाखल तारखेपासुन मागणेचा हक्क नाही. त्यामुळे अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे अतोनात असे नुकसान होईल असे कथन करुन वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

०५. वादी व प्रतिवादींच्या कथनांचा एकत्रित विचार करता, माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सुचवलेली दावा दुरुस्ती पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी |
| २) | सुचवलेल्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होईल काय ? | नकारार्थी |
| ३) | आदेश काय ? | अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ ते ३ करीता -

०६. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते सर्व चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात येत आहेत.

०७. पुढील विवेचन करण्यापुर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ मधील खाली नमुद कायदेशिर तरतुद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा -**

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा

अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारण केल्या पाहिजेत.

परंतू न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर , पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०८. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंच्या वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा कराराच्या परिपुर्तीसाठी दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमुद केलेली दावा दुरुस्ती ही मुळ दाव्यातील कथनांना जोडुन असल्याचे दिसुन येते. सदरची दावा दुरुस्ती ही विश्लेषणात्मक स्वरुपाची आहे. तसेच सदर सुचवलेली दावा दुरुस्ती २(अ) ही दाव्यातील मुळ कथनांशी संलग्न असुन ती अधिक विस्तृत स्वरुपाची आहे. त्याचप्रमाणे अर्जात नमुद केलेली दावा दुरुस्ती २(ब), २(क) यातील घडामोडी या दावा प्रलंबीत असताना दावा मिळकती संदर्भात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच दावा दुरुस्ती २(ड) नुसार वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२(क) प्रमाणे दरम्यानचे उत्पन्न मिळणेविषयी मागणी केलेली आहे. वादींनी त्यांच्या मुळ दाव्यामध्ये दाव्यातील विनंती परिच्छेद क्र.९(ड) मध्ये देखील दावा दाखल तारखेपासुनचे दरम्यानचे उत्पन्न मिळावे अशी मागणी केलेली आहे. सदर मागणीला अनुसरुन प्रस्तुत अर्जातील सुचित केलेली दावा दुरुस्ती २(ड) ची मागणी वादींनी केलेली आहे. वादींनी सुचवलेली दावा दुरुस्ती ही वादींच्या दाव्यातील मुळ कथनांना अनुसरुनच असल्याने सदर दावा दुरुस्ती ही मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. याऊलट उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी सदरची दुरुस्ती ही न्यायोचित व आवश्यक असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरची दावा दुरुस्ती मंजूर होण्यास वादी पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.३ चे निष्कर्षाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

१) वादींचा अर्ज खर्च रक्कम रु.५००/- ने मंजूर करण्यात येत आहे. वादींनी सदर खर्चाची रक्कम प्रतिवादीला दयावी.

२) वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन दाव्याची दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

JANABAI SHESHRAO GAIKWAD

Digitally signed by JANABAI SHESHRAO GAIKWAD
Date: 2022.03.25 14:59:44 +0530

( जे.एस.गायकवाड )

दि.२५/०३/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
पेठ वडगांव